# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन शिवार, नाशिक - 422 222.

दूरध्वनी - (0253) 2231714, 2231715, 2230027, 2230459


जावक क्र. : यचममुवि/आस्था/पदोन्नती/२०१७/३/664 दिनांक : ३०.०६.२०१७

**संदर्भ :** (१) The YCMOU Group B, C & D Staff Recruitment and Promotion Rules १९९२(Draft)
(व्यवस्थापन मंडळ सभा दि. १२.०९.१९९२, विषय क्र. १००.९२.०९)

(२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२ दिनांक १२ सप्टेंबर, २०१६

**विषय - वरिष्ठ सहायक या संवर्गात पदोन्नती**

**कार्यालयीन आदेश**

मा. कुलगुरुंच्या मान्यतेनुसार आणि पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार **सहायक** या संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांना **वरिष्ठ सहायक (वेतनसंरचना रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४२००)** या संवर्गात खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून संभाव्य रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | पदोन्नतीचे पद | सध्याचा विभाग | पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेला विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | सौ. स्मिता आनंद कुलकर्णी<br>सहायक | वरिष्ठ सहायक<br>(खुला प्रवर्ग) | परीक्षा विभाग | खरेदी कक्ष |
| २ | श्री. प्रकाश फकिरराव देशमुख<br>सहायक | वरिष्ठ सहायक<br>(खुला प्रवर्ग) | परीक्षा विभाग | विभागीय केंद्र, मुंबई |
| ३ | श्री. अमोल गुलाबराव पाटील<br>सहायक | वरिष्ठ सहायक<br>(खुला प्रवर्ग) | सेवा सुविधा कक्ष | विभागीय केंद्र, नागपूर |
| ४ | श्री. राजेश हिरालाल आहेर<br>सहायक | वरिष्ठ सहायक<br>(खुला प्रवर्ग) | विधी कक्ष | विभागीय केंद्र, पुणे |

१. उपरोक्त पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीच्या पदावर पदस्थापना करण्यात आलेल्या ठिकाणी सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आंत हजर होऊन रुजू अहवाल विभाग प्रमुखांमार्फत कुलसचिव कार्यालयास दोन प्रतीत सादर करावा.

२. विहीत कालावधीत हजर न झाल्यास त्यांना ही पदोन्नती स्विकारण्यामध्ये स्वारस्य नाही असे समजून त्यांच्या पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील. तसेच वित्त विभाग निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ दिनांक ०१-०४-२०१० नुसार त्यांना आश्वासित प्रगती योजना अंतर्गत वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मिळण्यास पात्र झाले तर त्यांनी नाकारलेली ही पदोन्नती विचारात घेऊन आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाबाबत निर्णय घेण्यात येईल.

३. पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्याने सदर पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२ दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ मध्ये आदेशित केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

Scanned by CamScanner

४.	शासन निर्णय वित्त विभाग क्र. पीएवाय-१०८२/सीआर-११००(एक)/एसईआर-३ दि. ०६.११.१९८४ नुसार पदोन्नतीच्या पदावर हजर झाल्यापासून (लागू असल्यास) एक महिन्याचे आंत वेतन निश्चितीबाबत विकल्प देणे आवश्यक असून एकदा दिलेला विकल्प अंतिम समजण्यात येईल. सोबत विकल्पाचा नमुना दोन प्रतीत जोडला आहे. विहीत मुदतीत विकल्प सादर न केल्यास विकल्प दिला नाही असे गृहीत धरून वेतन निश्चिती करण्यात येईल.

५.	विद्यापीठाच्या ध्येयधोरणानुसार संबंधितांनी पदोन्नती दिलेल्या पदावर अधिक महत्त्वाची कर्तव्ये व जबाबदारीची कामे कार्यकुशलतेने करणे बंधनकारक राहील. तसेच त्यांचेकडे असलेल्या कामाव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार विद्यापीठातील सक्षम अधिकाऱ्याने सोपविलेले काम व जबाबदारी निष्ठेने पार पाडावी लागेल. पदोन्नती दिलेल्या पदावरील काम समाधानकारक आढळून न आल्यास पूर्वपदावर पदावनत करण्यात येईल.

६.	भविष्यात आपली बदली विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही सध्या आस्तित्वात असलेल्या किंवा भविष्यात निर्माण होणाऱ्या विभागीय किंवा अन्य केंद्रावर करण्यात येईल.

७.	यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायद्यातील तरतूदी, अनुषंगिक अधिनियम, नियम व अध्यादेश व त्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल, त्याचप्रमाणे विद्यापीठाने प्रमाणित केलेली आचारसंहिता संबंधितांवर बंधनकारक राहील व त्या सर्वांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

(डॉ.दिनेश भोंडे)
कुलसचिव

**सोबत विकल्प नमूना**

**प्रति,**

१.	**सौ. स्मिता आनंद कुलकर्णी**
	सहायक, परीक्षा विभाग, यचममुवि, नाशिक
२.	**श्री. प्रकाश फकिरराव देशमुख**
	सहायक, परीक्षा विभाग, यचममुवि, नाशिक
३.	**श्री. अमोल गुलाबराव पाटील**
	सहायक, सेवा सुविधा कक्ष, यचममुवि, नाशिक
४.	**श्री. राजेश हिरालाल आहेर**
	सहायक, विधी कक्ष, यचममुवि, नाशिक

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :

१.	मा. कुलगुरू यांचे कार्यालय
२.	वित्त अधिकारी
३.	परीक्षा नियंत्रक
४.	उपकुलसचिव, सेवा सुविधा कक्ष / विधी कक्ष
५	विभागीय संचालक, विभागीय केंद्र (१) मुंबई (२) नागपूर (३) पुणे
६.	सहायक कुलसचिव, खरेदी कक्ष
७.	आरक्षण कक्ष
८.	वैयक्तिक नस्ती
९.	कार्यालयीन आदेश धारिका
१०.	विद्यापीठ संकेत स्थळ

Scanned by CamScanner